योग्य करिअरची निवड महत्त्वाची - श्री. चेतन गोडबोले

करिअरची निवड करत असताना विद्यार्थ्यांनी भविष्यातील अचूक संधी ओळखून अचूक करिअरची निवड करणे अत्यंत महत्त्वाचे आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी नेहमी जागरूक राहून नेतृत्व करण्यासाठी आवश्यक असणारे सर्व गुण आत्मसात करून योग्य करिअरच्या दिशेने वाटचाल करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन श्री. चेतन गोडबोले यांनी केले. श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथे आयोजित "बी अ लीडर विथ कॉमर्स" विषयावर आधारित कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. विद्यार्थ्यांनी एक चांगला लीडर बनण्यासाठी चांगल्या प्रकारचे संवाद कौशल्य स्वतःच्या अंगी निर्माण करावे. आपल्याजवळ असलेल्या कल्पनाशक्तीचा वापर करून वाणिज्य शाखेतील लीडर बनण्यासाठीच्या आणि विविध संधीचा लाभ घेण्यासाठी अचूक निर्णय क्षमता व संवाद कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. डिजिटल व आधुनिक युगात हार्ड वर्क पेक्षा स्मार्ट वर्क करणे गरजेचे बनले आहे त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी आपले प्रयत्न करायला हवे असे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने उपस्थित होते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी करियर बनविण्यासाठी पारंपारिक मार्ग न जोपासता नव्या पद्धतीने करिअर बनवण्यासाठी वेगळ्या वाटा शोधणे गरजेचे आहे. वाणिज्य शाखेमध्ये अशा अनेक मोठमोठ्या संधी उपलब्ध होतात त्या वेळीच ओळखून त्यामध्ये यश संपादन करणे आवश्यक आहे असे मत आपल्या अध्यक्षीय मनोगत त्यामध्ये त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे यांनी प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापक श्री. एस. बी. मलघाण यांनी केले व कुमारी

भक्ती गुरव हिने सूत्रसंचालन केले.

